नि.फौ.ख.क्र. ७७/२०१८
(नि. ५०)

<u>सा.क्र.४ यांचा उर्वरित उलटतपास आरोपी क्र.२, ४ ते ६ यांच्यातर्फे वकील श्री.एस.एन.भणगे यांचेतर्फे सुरु –</u>

४. माझ्या एका मुलीचे नाव गायत्री जयवंत राय असे आहे. (साक्षीदाराला मा.जिल्हा सत्र न्यायालयातील आरोपपत्र क्र. ३४/२०१५ चा दोषारोपपत्र दाखविण्यात आले.) त्यामध्ये यातील आरोपी बाबुराव आरोलकर याच्या मुलाच्या केसमध्ये माझी मुलगी गायत्री ही साक्षीदार होती. (साक्षीदाराला वेंगुर्ला न्यायालयातील नि.फौ.ख.क्र.२५/२००९ चा न्यायनिर्णय दाखविण्यात आला.) त्यामध्ये प्रशांत बागकर आरोपी होते त्याकामी माझी फिर्यादीतर्फे सा.क्र.२ म्हणून साक्ष झालेली आहे. (साक्षीदाराला वेंगुर्ला न्यायालयातील नि.दि.मु.क्र.१३/२००५ मधील निशाणी १७५ मधील सहीसूद नक्कल दाखविण्यात आली.) त्यावर माझी सही व प्रतिज्ञापत्र आहे. सदरचे प्रतिज्ञापत्र मी यातील आरोपी बाळकृष्ण येसजी विरुध्द चंद्रकांत आरोलकर यांच्या केसमध्ये दाखल केले होते. सदरच्या अर्जावरील आदेश पाहता मी दिलेले दोन्ही अर्ज न्यायालयाने नामंजूर केल्याचे दिसून येते. (साक्षीदाराला अर्ज क्र.२८/२०२२ येथील निशाणी ४ दाखविण्यात आली.) हे म्हणणे खरे आहे की मा. धर्मदाय सहआयुक्त कोल्हापूर यांनी यातील अर्ज क्र. २८/२०२२ मध्ये श्रीदेव वेतोबा देवस्थान कमिटी, आरवली यांनी धोरणात्मक निर्णय घेवू नये असा आदेश झालेला आहे. हे म्हणणे खरे आहे की आमच्या देवस्थानामध्ये गुरव आडनावाचे पुजारी आहेत त्यांना देवस्थानाने नोटीस दिलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की देवस्थानच्या जमिनीमध्ये पुजारी गुरव यांची कूळ म्हणून नोंद झालेली आहे. ती नोंद साधारण २० वर्षांपुर्वी झालेली आहे. हे म्हणणे खरे आहे की सदरची गुरवांची नोंद काढून टाकण्याकरीता देवस्थानाने आर.टि.एस.अपिल दाखल केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की या नोंदीची इतक्या वर्षाची माहिती देवस्थानचे सचिव सावळाराम टाक्कर यांना माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की जीवन प्राधिकरणास ग्रामपंचायत आरवली यांनी जागा दिली असे जे माझे म्हणणे आहे ते दाखविण्यासाठी माझ्याकडे कोणताही कागदोपत्री पुरावा नाही. जीवन प्राधिकरणास ग्रामपंचायतीने कोणत्या सर्वे क्रमांक व हिस्सा क्रमांकाची जागा दिली हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की संडास, मुताऱ्यांचे बांधकाम पूर्णत्वास जाण्यास त्याची टाकी व मुलमूत्र संचनाची टाकी असल्याशिवाय पुर्ण होत नाही. सदरची टाकी बांधली गेली काय, ती कोणत्या सर्वे क्रमांक व हिस्सा क्रमांकामध्ये बांधली व ती कोणाच्या मालकीची होती याबाबत मला माहिती नाही. तथाकथीत संडास व बाथरुम यांच्यासमोर देवाच्या पालखीची वाट आहे किंवा कसे याबाबत मला माहिती नाही. वेतोबाची पालखी ज्या ज्या वाटेवरुन जाते त्या त्या वाटेवरील भाविकांच्या भावना गुंतलेल्या आहेत. जे.सी.बी.कोणाच्या मालकीचा होता व तो कोणी आणला याबाबत मला माहिती नाही. जे.सी.बी. व बांधकामाचे साहित्य आजरोजी न्यायालयात नाही.

५. मला दामोदरे या व्यक्तीने फिर्याद दिली याबाबत माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की दामोदरे यांनी जी फिर्याद दिली आहे त्यामध्ये त्यांनी आरोपींच्या नावाचा उल्लेख केलेला नाही. पोलीस पाटील मधुसुदन सुतार मेस्त्री यांनी आपल्या तक्रारी अर्जामध्ये आरोपींनी तथाकथीत बांधकाम तोडले अशी फिर्याद दिलेली नाही याबद्दल मला माहिती नाही. घटना नक्की कोणत्या दिवशी घडली हे मला आठवत नाही. माझ्या जबाबामध्ये कोणत्या दिवशी घटना घडली याचा मी उल्लेख केलेला नाही. माझ्या म्हणण्यानुसार आरोपींपैकी एक ते दोन इसम हे देवस्थाच्या विरोधी काम करणारे आहेत. हे म्हणणे खरे नाही की माझ्या सरतपासातील मजकूर 'शौचालयाच्या इमारतीचा ताबा ग्रामपंचायत आरवली यांनी घेतला नसल्यामुळे तो महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग सावंतवाडी यांच्याकडे होता, आरोपी यांनी शौचालयाच्या इमारतीचा दर्शनी भाग जे.सी.बी.च्या सहाय्याने तोडला, सदर घटनेच्यावेळी तेथे गणेश रेगे, बाबूराव आरोलकर, सुभाष कांबळी, यशवंत काबळी, बाळकृष्ण येसजी, अनंत कुडव, सुभाष पेडणेकर हे लोक उपस्थित होते, सदरचा जे.सी.बी. हा अण्णा झांटये व विजय नाईक यांच्या मालकीचा असून तो आरोपींनी बोलाविला होता, सदर घटना मी प्रत्यक्ष पाहिली होती, आरोपी व्यतिरिक्त तेथे आरवली गावचे पोलीस पाटील, उपसरपंच हजर होते, शौचालयाच्या इमारतीचा दर्शनी भाग आरोपींनी जे.सी.बी.च्या सहाय्याने तोडल्यानंतर आरवली गावचे पोलीस पाटील यांनी आरवली ग्रामपंचायत येथे तक्रार नोंदविण्याचा प्रयत्न केला, परंतु, तेथे ती नोंदवून घेण्यात आली नाही. त्यानंतर आरवली गावचे पोलीस पाटील यांनी जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांच्याकडे तक्रार नोंदविली, सदर कार्यालयाकडून देखील दखल न घेतल्यामुळे पोलीस पाटील यांनी लोकायुक्त मुंबई यांच्याकडे तक्रार नोंदविली, लोकायुक्त मुंबई यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग सावंतवाडी यांना आरोपींविरुध्द गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले, त्यानंतर महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग सावंतवाडी यांच्या अधिकाऱ्यांनी आरोपींविरुध्द पोलीस स्टेशनला गुन्हे दाखल केले व कथीत घटनेबाबत माझ्याकडे पोलीसांनी चौकशी केली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की मी, पोलीस पाटील मेस्त्री व देवस्थानचे विश्वस्त यांनी देवस्थानास जे जे विरोध करतात यांच्यावर खोटी केस दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

<u>उलटतपास पूर्ण.</u>
<u>फेरतपास नाही.</u>

श्रवणोत्तर स्विकृत

सही/-

दिनांक- ११/०७/२०२४

(डी.वाय.रायरीकर)
न्यायदंडाधिकारी वर्ग १, वेंगुर्ला.